# प्रेस नोट

**" पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, तळवडे येथील कंपनीमध्ये झालेल्या दुर्घटनेतील मृतांची ओळख पटली असुन आता पर्यंत गुन्ह्यातील तीन आरोपीत अटक"**

देहुरोड पोलीस स्टेशन परिसर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दि. 08/12/2023 रोजी तळवडे येथील शिवराज एंटरप्रायजेस कंपनी, तळवडे, येथे वाढदिवसाचे स्पार्कल कॅन्डल बनविण्याचे कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत कंपनीमध्ये काम करणारे 16 कामगार हे भाजुन त्यात आजपावेतो एकुण 9 कामगार हे मृत पावले असुन 7 कामगार हे जखमी अवस्थेत उपचार कामी सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आलेले आहे. सदर घटनेत गंभीरपणे भाजलेले 06 कामगार यांची ओळख पटविणे अवघड होते त्यामुळे त्यांचे डि.एन.ए. सॅम्पल काढुन सदर मृत व्यक्तींची ओळख पटविणे कामी त्यांचे नातेवाईक यांचा शोध घेवुन त्यांचे डि.एन.ए. सॅम्पल काढुन ते मा. वैज्ञानिक प्रयोग शाळा येथे पाठविण्यात आले. शनिवार / रविवार शासकीय सुट्टी असताना देखील मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड शहर यांनी पाठपुरावा केला होता आणि डि.एन.ए. रिपोर्ट प्राप्त करुन घेतले त्यामुळे ओळख पटलेल्या मयतांचे मृतदेह उदईक रोजी नातेवाईक यांचे ताब्यात देवुन अंत्यविधी करण्यात येत आहे.

सदर गुन्ह्यात आता पर्यंत 1) शुभांगी शरद सुतार, वय 35 वर्षे,(मुख्य आरोपीत यांची पत्नी) 2) नजीर अमीर शिकलगार, वय 71 वर्षे, (जागा मालक याचे पती व व्यवहार पाहणारे) 3) सागर रमेशचंद भक्कड, वय 37 वर्षे, ( केमीकल साहित्य पुरविणारा ) यांना अटक करण्यात आलेली आहे. मुख्य आरोपीत शरद सुतार, वय 45 वर्षे, हा सदर दुर्घटनेत जखमी असुन तो ससुन हॉस्पीटल येथे उपचार घेत आहे.

सदर गुन्ह्याचा अधिक तपास चालु आहे.

डॉ. काकासाहेब डोळे
पोलीस उप-आयुक्त पिं.चिं.